
# आशवसक चित्र

## स्वाध्याय

**अ. आकलन**


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. मांडीवरच्या बाहुलीला थोपटत गॅसवर भाताचं आधण चढवते.

२. चेंडू उंच उडवून ओंजळीत पकडते.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. आपलं कसब दाखवणं.


२. त्याचवेळी घर सांभाळणं.

**कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. उद्याच्या जगाचं आश्वासक चित्र.
२. जिथे सारे खेळ एकत्र खेळले जातील.

**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. बाहुली २. चेंडू

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**

१. **मुलगा खेळत असलेला खेळ** → [ ]

२. **कवयित्रीला झरोक्यातून दिसणारे आश्वासक चित्र** → [ ]

**उत्तर:** १. चेंडू उंच उडवून हातात झेलणे.

२. उद्याच्या जगातील स्त्री-पुरुष समानता.

**कृ.६. कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. _______ 'आश्वासक चित्र' या कवितेच्या कवयित्री आहेत.

(गिरीजा / नीरजा / आत्मजा / नीशीजा)

२. 'आश्वासक चित्र' ही कविता _______ या कवितासंग्रहातून घेतली आहे.

(कागदाचे पक्षी / अर्थाचे पक्षी / निरर्थकाचे पक्षी / निरर्थक पक्षी)

३. एका हातानं थोपटत तिला चढवते _______ भाताचं.

(आधण / पाणी / टोप / पातेले)

४. अचानक बाजूला ठेवून _______ ती जवळ जाते त्याच्या.

(चेंडूला / बाहुलीला / पातेल्याला / झाडूला)

**उत्तर:** १. नीरजा २. निरर्थकाचे पक्षी

३. आधण ४. बाहुलीला

**कृ.७. खाली दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. मुलगा शिकेल हळूहळू आपलं कसब दाखवतानाच ________

अ. घर निवडणं.

ब. घर टापटीप ठेवणं.

क. घर सांभाळणं.

ड. बाहुलीला झोपवणं.

२. उद्याच्या जगात मुलं-मुली सारे खेळ ________

अ. एकत्र खेळतील.

ब. चुरशीने खेळतील.

क. समान आवडीने खेळतील.

ड. नेटाने खेळतील.

**उत्तर:** १. मुलगा शिकेल हळूहळू आपलं कसब दाखवतानाच **घर सांभाळणं.**

२. उद्याच्या जगात मुलं-मुली सारे खेळ **एकत्र खेळतील.**

**कृ.८. सत्य विधान शोधून लिहा.**

घराच्या झरोक्यातून कवयित्रीला उद्याच्या जगाचं आश्वासक चित्र असं दिसेल –

अ. मुलगा चेंडू घेऊन स्वत:चे कसब दाखवेल.

ब. मुलगी बाहुलीच्या खेळात रमलेली असेल.

क. मुलगी एकटीच चेंडू व बाहुली दोन्ही सांभाळत असेल.

ड. मुलाचा व मुलीचा हातात हात असेल आणि त्यांवर चेंडू व बाहुली दोन्ही जोडीने विसावलेले असतील.

**उत्तर:** मुलाचा व मुलीचा हातात हात असेल आणि त्यावर चेंडू व बाहुली दोन्ही जोडीने विसावलेले असतील.

**कृ.९. असत्य विधान शोधून लिहा.**

तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून –

अ. एक मुलगी भातुकलीचा खेळ खेळत आहे.

ब. एक मुलगा बाहुलीला थोपटतो आहे.

क. एक मुलगी बाहुलीला थोपटते आहे.

ड. मुलगी इवल्याशा गॅसवर भाताचं आधण ठेवते आहे.

**उत्तर:** एक मुलगा बाहुलीला थोपटतो आहे.

## कृ.१०.कवितेवर आधारित प्रश्न

१. 'ती म्हणते,

**'मी दोन्ही करू शकते एकाच वेळी. तू करशील?'**
**या काव्यपंक्तीचा आशय स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'आश्वासक चित्र' या कवयित्री नीरजा यांच्या कवितेतून त्यांनी भविष्यातील स्त्री-पुरुष समानतेविषयीचं आश्वासक चित्र मांडलं आहे. त्यांच्या घराच्या झरोक्यातून दिसणाऱ्या दृश्यातली मुलगी भातुकली खेळत आहे. मध्येच तिचे लक्ष बाजूला चेंडूने खेळणाऱ्या मुलाकडे जाते व ती मांडीवरची बाहुली व भातुकली बाजूला सारून त्याच्याकडे जाते. ती त्याच्याकडे चेंडू मागते; पण तो तिला हिणवून म्हणतो, तू पाल्याची भाजी कर (स्वयंपाक मुलींचे काम आहे, ते तू कर.); पण पूर्ण आत्मविश्वासाने ती त्याला सांगते, की मी स्वयंपाक करणे आणि चेंडू उडवणे हे दोन्ही एकाच वेळी करू शकते; पण तुला हे जमेल का? मुलीच्या तोंडी असलेले हे उद्गार आधुनिक स्त्रीचा आत्मविश्वास व सामर्थ्य मार्मिकपणे अधोरेखित करतात.

२. **'माझ्या घराच्या झरोक्यातून दिसतं आहे**
**एक आश्वासक चित्र उद्याच्या जगाचं**
**जिथं खेळले जातील सारेच खेळ एकत्र'**
**या काव्यपंक्तीतून कवयित्रीला नेमके काय सूचित करायचे आहे?**

**उत्तर:** कवयित्री नीरजा यांच्या 'आश्वासक चित्र' या कवितेतील वरील काव्यपंक्तींतून कवयित्री भविष्यातील स्त्री-पुरुष समानतेविषयी आशावाद व्यक्त करते. तिच्या घराच्या झरोक्यातून तिला एक मुलगी व मुलगा खेळताना दिसत आहेत. मुलगी भातुकली व बाहुलीसोबत खेळता खेळता अचानक उठून चेंडू खेळणाऱ्या मुलाकडे गेली व तिने चेंडू खेळायला सुरुवात केली. तिचे चेंडूचे कसब पाहून मुलाला आश्चर्य वाटले. तिच्या सांगण्यावरून त्याने बाहुलीला झोपवले व भातुकलीत रमला. हे चित्र कवयित्रीला भविष्यातील स्त्री-पुरुष समानतेच्या संदर्भात आश्वासक वाटते; कारण ते दोघे सारे खेळ एकत्र खेळत आहेत. म्हणजेच भविष्यात ते दोघे स्त्री-पुरुषांच्या पारंपरिक भूमिकांना तडे देत परस्पर सहकार्याने व सामंजस्याने कामे करतील असे कवयित्रीला वाटते. भविष्यातल्या स्त्री-पुरुष समानतेची चाहूल कवयित्रीला मुलांचा खेळ पाहताना लागली आहे.

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

### कृ.१. खालील शब्दांना पर्यायी शब्द लिहा.

१. झरोका : [ ]

२. कसब : [ ]

३. आभाळ : [ ]

४. कौतुक : [ ]

५. घर : [ ]

६. ओंजळ : [ ]

७. जोडीनं : [ ]

८. आश्वासक : [ ]

**उत्तर:** १. खिडकी २. कौशल्य

३. आकाश, नभ ४. प्रशंसा

५. गृह, सदन, भवन ६. पसा

७. सोबतीनं ८. उत्साहवर्धक

### कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.

१. भात, चेंडू, गॅस, आधण

२. बाहुली, चेंडू, खेळ, वास्तव

**उत्तर:** १. चेंडू २. वास्तव

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. अन्न शिजविण्यासाठी तापवायला ठेवलेले पाणी :

२. लहान मुलींचा खोटा-खोटा स्वयंपाकाचा खेळ :

**उत्तर:** १. आधण २. भातुकली

**कृ.४. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**

१.

**भातुकलीतून**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| भातुकली | भाक | भान | कली | लीन | नभ |

**उत्तर:** नभ

२.

**बाहुलीला**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| बाला | बाहुली | बाहुला | बाहुबली | लाली | लीला |

**उत्तर:** बाहुबली

## क. माझा अभ्यास - व्याकरण

**कृ.१. कवितेच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | विशेषणे | | विशेष्ये |
|---|---|---|---|
| १. | एकत्र | अ. | ऊन |
| २. | आश्वासक | ब. | गॅस |
| ३. | तापलेले | क. | चित्र |
| ४. | इवलासा | ड. | खेळ |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - अ), (४ - ब)

**कृ.२. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये वर्गीकरण करा.**

(ऊन, ती, ओंजळ, राहते, आश्वासक, शिकले, मी)

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| ऊन, ओंजळ | ती, मी | आश्वासक | राहते, शिकले |

क्र.३. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | हातांनी | | |
| २. | बाहुलीला | | |
| ३. | वास्तवात | | |
| ४. | भाताचं | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | हातांनी | नी | तृतीया |
| २. | बाहुलीला | ला | द्वितीया / चतुर्थी |
| ३. | वास्तवात | त | सप्तमी |
| ४. | भाताचं | च | षष्ठी |

**कृ.४. वाक्यातील अव्यये ओळखून त्यांचा प्रकार लिहा.**

'मुलगी पाहत राहते कौतुकानं त्याच्याकडे.
अचानक बाजूला ठेवून बाहुलीला ती जवळ जाते त्याच्या.'

**उत्तर:** जवळ, अचानक, कौतुकानं, बाजूला – क्रियाविशेषण अव्यय

त्याच्याकडे – शब्दयोगी अव्यय

**कृ.५. 'आश्वासक चित्र' या कवितेचा छंद ओळखा.**

अ. अभंग    ब. मुक्तछंद

क. ओवी

**उत्तर:** ब. मुक्तछंद

**कृ.६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

१. मुलगा पाहत राहतो आश्चर्यचकित.

**उत्तर:** **मुलगी** पाहत **राहते** आश्चर्यचकित.

२. मुलगी चेंडू मागते त्याच्याकडे.

**उत्तर:** **मुलगा** चेंडू **मागतो** त्याच्याकडे.

**कृ.७. खालील शब्दांचे वचन बदला.**

१. बाहुली    २. चेंडू

**उत्तर:** १. बाहुल्या    २. चेंडू

**कृ.८. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | बाहुली | बाऊली | बावली | भाहुली |
| २. | कौतुक | कौतूक | कवतुक | कोतुक |
| ३. | आच्छर्यचकित | आश्चर्यचकित | आर्श्चयचकित | आश्चर्यचकीत |
| ४. | भातुकली | भातूकली | भातुकलि | भातूकलि |

**उत्तर:** १. बाहुली  २. कौतुक

३. आश्चर्यचकित  ४. भातुकली

ड. **माझे मत**

**कृ.१. या कवितेतून कवयित्री कोणते आश्वासक चित्र रंगवत आहे, असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर:** कवयित्री नीरजा आपल्या 'आश्वासक चित्र' या कवितेतून मुला-मुलीच्या खेळातून स्त्री-पुरुष समानतेचं आश्वासक चित्र रंगवत आहेत. यातील मुलगी भातुकली बाजूला सारून तथाकथित पुरुषी खेळ 'चेंडू' खेळते आणि मुलगा चेंडू मुलीकडे देऊन तथाकथित स्त्रियांचा 'भातुकली' खेळ खेळू लागतो. ह्या प्रसंगातून कवयित्रीला अशी आशा वाटते आहे, की ही लहान मुलं भविष्यात मोठी होऊनही या पारंपरिक भूमिकांतून बाहेर पडून परस्पर सामंजस्य, सहकार्याने जीवन जगतील; ज्यामुळे आजच्या पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्री-पुरुषांतील भेदाभेद नष्ट होतील. खऱ्या अर्थाने स्त्री व पुरुषांतली दरी मिटून जाईल व ज्या सहजतेने ही मुलं एकमेकांचे खेळ खेळतात, त्याच सहजतेने ही मुलं उद्या मोठी झाल्यावर एकमेकांची कामे करतील याची कवयित्रीला खात्री वाटते. या प्रसंगात आधुनिक स्त्रीचा स्वकर्तृत्वावरचा विश्वास, आव्हान पेलण्याची तिची तयारी, तसेच स्त्रीची क्षमता पाहून स्वत:ची मानसिकता व त्यानुसार वर्तणूकही बदलणारा पुरुष हे सर्व कवयित्रीने मार्मिकपणे रेखाटले आहे.

**क्र.२. 'स्त्री व पुरुषांची कामे यांत भेद असतो' याबद्दल तुमचे मत मांडा.**

**उत्तर:** 'स्त्री व पुरुषांची कामे यांत भेद असतो.' हे मला मुळीच मान्य नाही; कारण हा भेद निसर्गाने केला नसून आपण मानवानेच केला आहे. स्त्री व पुरुष दोघांनाही निसर्गाने समान बुद्धी, विचारक्षमता व काम करण्याची क्षमता दिली आहे. त्यामुळे आज असंख्य महिला रेल्वे, विमाने, अगदी अंतरिक्ष यानही चालवत आहेत, तर कचेरीतील उच्चपदेही समर्थपणे पेलत आहेत. आज स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व क्षेत्रांत कार्यरत आहेत. असे असताना पुरुषही घर, मुलं, स्वयंपाक आदींशी संबंधित जबाबदाऱ्या पार पाडत आहेत. त्यालाच स्त्री-पुरुष समानता म्हणतात. तेव्हा या समानतेच्या युगात स्त्रियांच्या व पुरुषांच्या कामांत भेद करणं किंवा तसा मानणं अगदी चुकीचे आहे.